Estd. 1962
NAAC "A" Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

सर्व मुकबधीर / (कर्णबधीर) श्रवणशक्तीतील दोष असणाऱ्या प्रशासकीय अधिकारी / सेवकांना आदेशान्वये कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन यांचे पूरकपत्र क्र. वाहभ-२०१४/प्र.क्र.१३/सेवा-५ दि. १८ एप्रिल २०१७ नुसार मुकबधीर तसेच श्रवण शक्तीतील दोष असलेल्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता लागू करणेबाबत आदेश निर्गमित केला आहे. (सोबत शासन निर्णय जोडला आहे.)

सदरचा शासन निर्णय दि. २९/०४/२०१९ रोजी विषय क्र. १४ नुसार व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली आहे.

सदर शासन निर्णयानुसार -अपंग व्यक्तीसाठीच्या (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ मधील कलम २ (एल) मध्ये केलेल्या श्रवण शक्तीतील दोष (Hearing Impariment) च्या व्याख्येनुसार -"Hearing impariment" means loss of sixty decibels or more in the better ear in the conversational range of frequencies असा श्रवणदोष असणाऱ्या कर्मचाऱ्यांना; अंध, अस्थिव्यंगाने अधू व कण्याच्या विकाराने पिडीत असणाऱ्या राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय केलेल्या दराने, वाहतूक भत्ता, या पूरकपत्रान्वये अनुज्ञेय करण्यात येत आहे. (Trasnsport Allowance is made admissible to the Hearing Imparied employees, having loss of ६० decibels or more in the better ear in the conversational range of frequencies, as provided in Persons With Disabilities (Equal Opportunities, Protection Of Rights And Full Participation) Act, १९९५), as admissible at the rate equal to blinds, orthopaedically handicapped and Hunchback disability state Government employees.

या शासन पूरकपत्राचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या कर्णबधीर शासकीय कर्मचाऱ्यांना (Hearing Impaired Government employees) उपरोक्त परिच्छेदातील सन १९९५ च्या अधिनियमातील कलम २ (एल) मध्ये केलेल्या व्याख्येनुसार शासकीय रूग्णालयाच्या कान नाक घसा विभाग प्रमुखाचे अपंगत्वाचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच मुकबधीर / श्रवण शक्तीतील दोष असणाऱ्या कर्मचाऱ्यांना शासन परिपत्रक वित्त विभाग दिनांक ०४.०६.२००१ मधील अटी व शासन निर्णय वित्त विभाग दिनांक १०.०८.२०१५ मधील अट क्रमांक २ लागू राहील.

तेव्हा सर्व संबंधीत शिक्षक / शिक्षकेत्तर अधिकारी व सेवकांना कळविणेत येते की, त्यांनी त्यांचे अर्ज योग्य त्या दाखल्यांसह आवक विभागात **दि.२१/०६/२०१९** पूर्वी सादर करावेत.

कुलसचिव

**जा.क्र - आस्थापना /** 3129
**दिनांक -** 19 JUN 2019

**प्रति,**

**१. मा.कुलगुरू, मा. प्र- कुलगुरू, कुलसचिव, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी.-- यांचे कार्यालय**

**२. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक व सर्व प्रशासकीय विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक विभागातील सर्व प्रशासकीय अधिकारी / सेवकांच्या निदर्शनास आणावे.**

**३. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहाय्यक कुलसचिव व समकक्ष अधिकारी**

**४. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख.**

**५. इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक INTRANET वर Registrar Circulars या सदरात प्रसिध्द करावे.**

**६. जनसंपर्क कार्यालयास माहितीसाठी.**